# १५. आनंदाचं झाड

आमच्या शेवग्याला सुंदर, हिरवट पोपटी नाजूक पालवी फुटली होती. झाड जोमानं उंच उंच वाढत होतं. नाजूक पानांची हिरवी नक्षीदार जाळी पसरली होती. काही फांद्यांना मोहोर फुलला होता. पांढऱ्या रंगाच्या फुलांचे घोसच्या घोस झाडांवर लोंबत होते. हिरव्यागार झाडाला पांढऱ्याशुभ्र फुलांचा फुलोरा उठून दिसत होता. आमचा शेवगा खूप छान बहरला होता. येणाऱ्या-जाणाऱ्यांची नजर त्यावर पडल्याशिवाय राहत नव्हती. एके दिवशी आमच्या घरी शेजारच्या काकू आल्या अन् म्हणाल्या, ''दारात कधीही शेवगा लावू नये. घरात भांडणं होतात. हे झाड तुम्ही तोडून टाका.''

इतकं सुंदर झाड अन् तोडून टाका ! मला जरा त्या काकूंचा रागच आला. मी काही म्हणायच्या आतच आई म्हणाली, ''झाडं ती, सगळी सारखीच. उलट झाडं किती परोपकारी असतात. ती का बरं आपल्यात भांडणं लावतील? आपण माणसंच असा विचार करतो. झाडं तर आपल्याला फळं देतात, फुलं देतात, सावली देतात, पक्ष्यांना घरं देतात. आधार देतात. मी हे झाड लावलं ते जोपासण्यासाठी, तोडण्यासाठी नाही.''



काकू म्हणाल्या, ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

आई म्हणाली, ''नेऊ देत नेल्या तर. खाण्याचीच वस्तू ती. झाडांना त्या शेंगा फक्त आमच्यासाठीच नाही लागल्या. झाडाला शेंगा असेपर्यंत लोकांचं लक्ष झाडाकडे जाणारच.''

हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर रंगीबेरंगी पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता. आमचा शेवगा म्हणजे माझ्यासाठी निसर्गाचा अनमोल ठेवा.

या शेवग्यामुळेच मला विविध पक्ष्यांची अगदी जवळून ओळख झाली. त्या पक्ष्यांचे विविध आकार; देखणे, मोहक रंग; लयदार लकबी, गोड आवाज, त्यांच्या मजेदार हालचाली, त्यांची दिनचर्या इत्यादी कळली.

आमच्या शेवग्याच्या पांढऱ्याशुभ्र फुलांच्या घोसांवर रुंजी घालत गुंजारव करणाऱ्या जांभळट-काळ्या टपोऱ्या भुंग्याची व माझी भेट झाली. फुलांमधला मध पिऊन फुलांभोवती नाचणाऱ्या मधमाश्या मी पाहिल्या शेवग्यामुळे. अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ फुलचुख्यांची झुंबड मला दिसली. मधानं गच्च भरलेल्या फुलांतून हवेत अलगत मध चोखण्याची कला पाहावी ती फुलचुख्यांची. इटुकला बोटभर फुलचुख्या असतो मात्र कसरतपटू. एरवी मला कधीच दिसला नसता, फक्त आवाजच ऐकून होते, तो तांबट पक्षी मनमुरादपणे मान खाली-वर करत, अगदी एकाग्रतेनं तुक्तुक् आवाजाचा टणत्कार करताना मला चक्क दिसला. भर उन्हात शेवग्याच्या उंच उंच फांदीच्या शेंड्यावर कोकीळ पक्षीही शांतपणे झुलताना मी पाहिला. छोटे छोटे हिरव्या राघूंचे थवेच्या थवे अलगत उडत उडत, हवेत तरंगत कधी किडे तर कधी परागकेशरांचा फन्ना उडवताना पाहिलं.

राघू हवेत तरंगत शिकार करण्यात अगदीच पटाईत. सर्व ऋतूंमध्ये विविध पशु-पक्षी, कीटक-किड्यांचं 'आमचा शेवगा' हे माहेर बनलं होतं. वाळलेल्या शेंगांच्या बियांच्या मेजवानीसाठी पोपटांची नियमित हजेरी लागे. पोपटांचा हिरवागार रंग, लांबसडक शेपूट अन् नखरेबाज हालचाल मी अगदी जवळून पाहिली. बुलबुल पक्ष्याच्या सुरेल ताना मी आमच्या शेवग्यामुळेच ऐकू शकले. चिमण्यांची अखंड चिवचिव अन् साळुंक्यांची एकसारखी किलकिल, अगदी कान किट्ट करणारी, मी जवळून ऐकली. हिवाळ्यात तर खंड्या नियमित हजेरी लावू लागला. एरवी मी खंड्याला चित्रातच पाहिलं होतं. खंड्याचा तो देखणा मोरपंखी निळा रंग अन् रूप, बाकदार मोठी चोच, त्याची एकाग्रता अन् किलकिल आवाज करत सुळकी मारण्याची कला मला दाखवली, ती शेवग्यानं.

वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळी रूपं घेत आमचा शेवगा उभा आहे. माझा तो आवडता मित्र आहे. मी त्याची खूप निगा राखते. तो अजबखाना आहे. त्यानं मला किती किती सुंदर पक्षी, किडे, कीटकांची ओळख करून दिली. त्यानं माझं मनोरंजन तर केलंच, पण ज्ञानही दिलं, आनंदही दिला. शेवग्याची पानं मला खूप खूप आवडतात. किती सुरेख, झिरमिर हिरवीगार पानं. शेवग्याचा फुलोरा, पांढराशुभ्र रंग हा पक्ष्यांप्रमाणे माणसांचंही मन मोहित करतो. आपल्या हिरव्या रंगानं तो माझं मन प्रसन्न करतो. रोज नवीन उत्साह माझ्यात निर्माण करतो. त्याच्या अंगाखांद्यावर पक्ष्यांचा उत्साह बहरलेला असतो. हा पठ्ठा शेवगा आनंदानं झुलत डुलत त्यांना साद घालत असतो आणि या आनंद उत्सवात मीही सहभागी होते अन् नाचू लागते. गाऊ लागते.

**- लीला शिंदे**

**शब्दार्थ :** **फुलोरा** – फुलांचा बहर. **रुंजी घालणे** – भोवती फिरणे. **मनमुरादपणे** – मनसोक्तपणे. **फन्ना उडवणे** – खाऊन टाकणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शेवग्याच्या झाडावर कोणत्या रंगाच्या फुलांचे घोस लोंबत होते?

(आ) हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर कोणाचा मेळा भरत असे?

(इ) पशुपक्षी, कीटक-किड्यांचे माहेर कोणते?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडे आपल्याला काय काय देतात?

(आ) शेवग्यामुळे लेखिकेला पक्ष्यांच्या कोणकोणत्या गोष्टींची ओळख झाली?

(इ) लेखिकेला शेवग्याने काय काय दिले?

**प्र. ३. कोण, कोणास म्हणाले ?**

(अ) ''दारात कधीही शेवगा लावू नये. घरात भांडणं होतात. हे झाड तुम्ही तोडून टाका.''

(आ) ''मी हे झाड लावलं ते जोपासण्यासाठी, तोडण्यासाठी नाही.''

(इ) ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

**प्र. ४. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर .............. पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता.

(आ) अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ .............. झुंबड मला दिसली.

(इ) वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळी रूपं घेत आमचा .............. उभा आहे.

**प्र. ५. शेवग्याच्या झाडावर येणाऱ्या विविध पक्ष्यांची नावे पाठात आली आहेत. त्यांची यादी करा.**

**प्र. ६. 'कार' प्रत्यय जोडून नवीन शब्द बनवा.**

**उदा.**, गीत – गीतकार.

(अ) संगीत (आ) चित्र (इ) नाटक (ई) कला

**प्र. ७. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) परोपकार करणे. (आ) आधार देणे. (इ) फन्ना उडवणे. (ई) रुंजी घालणे.

(उ) सुळकी मारणे.

**प्र. ८. शेवग्याच्या शेंगांपासून कोणकोणते पदार्थ बनवतात ? त्यांतल्या कोणत्याही एका पदार्थाची कृती आई-बाबांना विचारून लिहा. उदा.**, शेवग्याचं पिठलं.

**उपक्रम :** तुमच्या जवळच्या एखाद्या झाडावर कोणकोणते पक्षी जमतात, त्यांचे निरीक्षण करा. त्यांची माहिती मिळवा. वर्गात सांगा.